N.M.C. Nagpur

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

## जाहिरात

**क्र. एमपीआर/७८१४ दि. १४.०८.२०२४**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खात्यांच्या आस्थापनेवरील गट 'क' मधील रु. २५,५००-८१,१०० (Pay Matrix-M15) अधिक अनुज्ञेय भत्ते या सुधारित वेतनश्रेणीतील 'कार्यकारी सहायक' (पूर्वीचे पदनाम, लिपीक) या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली १८४६ रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता/ पात्रता धारण करीत असलेल्या पात्र व इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या **https://portal.mcgm.gov.in/for prospects/careers-All/Recruitment/Chief Personal Officer** या संकेतस्थळावर सदरची संपूर्ण जाहिरात, अटी व शर्तींसह प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर जाहिरात दि. २०-०८-२०२४ ते दि. ०९-०९-२०२४ या कालावधीकरिता संकेतस्थळावर उपलब्ध राहील. संकेतस्थळावरील जाहिरातीला अनुसरून सदर पदासाठीची विहित अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या पात्र व इच्छुक उमेदवारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर भेट देऊन, जाहिरातीसोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करून विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज, ऑनलाईन पद्धतीने विहित वेळेत सादर करावा. उमेदवाराने संपूर्ण अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवावी. उमेदवारांच्या मार्गदर्शनार्थ कॉल सेंटर, भ्रमणध्वनी क्रमांक : ९५१३२५३२३३ सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत (दुपारी ०१.३० ते ०२.३० जेवणाची वेळ) सोमवार ते शनिवार उपलब्ध असेल.

| | | |
|---|---|---|
| पदाचे नाव | : | **'कार्यकारी सहायक' (पूर्वीचे पदनाम : लिपीक)** |
| वेतनश्रेणी (सुधारित) | : | **स्तर - M15 - रु. २५,५००-८१,१००** |
| भरावयाच्या रिक्त पदांची संख्या | : | **१८४६** |
| गट | : | **'क'** |

MySarkariNaukri.Com

**उपलब्ध रिक्त पदांचा तसेच सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

**(१) सामाजिक आरक्षणांतर्गत भरावयाची रिक्त पदे**

| तपशील | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ. | सा.शै. मा.व. | खुला/ अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची पदे | १४२ | १५० | ४९ | ५४ | ३९ | ३८ | ४६ | ४५२ | १८५ | १८५ | ५०६ | १८४६ |

**(२) समांतर आरक्षणांतर्गत भरावयाची पदे**

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ. | सा.शै. मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ४७ | ४८ | १७ | १८ | १२ | १२ | १५ | १४८ | ६० | ६० | १६७ | ६०४ |
| महिला ३०% | ४३ | ४५ | १५ | १६ | १२ | ११ | १४ | १३६ | ५६ | ५६ | १५२ | ५५६ |
| माजी सैनिक १५% | २१ | २३ | ७ | ८ | ६ | ६ | ७ | ६८ | २८ | २८ | ७६ | २७८ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ७ | ८ | २ | ३ | २ | २ | २ | २३ | ९ | ९ | २५ | ९२ |
| भूकंपग्रस्त २% | ३ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ९ | ४ | ४ | १० | ३८ |
| खेळाडू ५% | ७ | ८ | २ | ३ | २ | २ | २ | २३ | ९ | ९ | २५ | ९२ |
| अंशकालीन पदवीधर(सुशिक्षित बेरोजगार) १०% | १४ | १५ | ५ | ५ | ४ | ४ | ५ | ४५ | १९ | १९ | ५१ | १८६ |
| एकूण | १४२ | १५०* | ४९ | ५४ | ३९ | ३८ | ४६* | ४५२ | १८५ | १८५ | ५०६ | १८४६ |

MySarkariNaukri.Com

**अनाथ मुलांसाठी (१%)** : १८ पदे आरक्षित होत आहेत.
परिपत्रक क्र. एमबीसी/९४७६ दि. २६.०४.२०२३ सोबतचा महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-२०२२/प्र. क्र. १२२/का-०३ दि. ०६.०४.२०२३ अन्वये प्राप्त निर्देशानुसार, १८ पदांपैकी **संस्थात्मक प्रवर्गाकरिता-०९ पदे व संस्थाबाह्य प्रवर्गाकरिता - ०९ पदे आरक्षित होत आहेत.**

**दिव्यांगांसाठी (४%)** : ७३.८४ = पूर्णांकात ७४ पदे आरक्षित होत आहेत (अ-१९, ब-१९, क-१८, ड/ई-१८)

* अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेली कार्यकारी सहायक (पूर्वीचे पदनाम : लिपीक) व तत्सम संवर्गातील १५ पदे (अज-१०, विमाप्र-०५) भरण्याकरिता एकूण रिक्त पदांमध्ये समाविष्ट आहेत.

**सही/- दि. १४.०८.२०२४**
**प्रमुख कर्मचारी अधिकारी**
**सामान्य प्रशासन विभाग**

PRO/994/ADV/2024-25